# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 05/03/2024 (मंगळवार) सायंकाळ

---

### अवैधरीत्या देशी दारु
### तसेच अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू बाळगणाऱ्या
### इसमांवर कायदेशिर कार्यवाही

दिनांक ०४/०३/२०२४ रोजी पोलीस स्टेशन भिवापूर येथील स्टाफ पोलीस स्टेशन भिवापूर हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून भिवापूर हद्दीतील सिद्धार्थ नगर भिवापूर येथे **आरोपी नामे— दिगंबर मोडकू मेश्राम, वय ५१ वर्ष, रा. तास कॉलनी भिवापूर त. भिवापूर** हा देशी दारू विक्री करीता बाळगताना मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातून देशी दारू संत्रा ९९९ च्या १८० एम एल च्या ७ सीलबंद निपा असे असे एकूण १२६० एम एल प्रत्येकी ८०/— रू. प्रमाणे ५६०/— रू. चा माल मिळून आला. पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीविरुध्द कलम ६५ (ई), महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच पोस्टे कन्हान अंतर्गत दि. ०४/०३/२०२४ रोजी केरडी शेत शिवार येथे मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमावर कार्यवाही करण्यात आली. **आरोपी नामे— अरविंद कवडु मानवटकर, रा. साटक ता. रामटेक जि. नागपुर** हा अवैधरीत्या मोहाफुल रसायन सडवा बाळगतांना मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून एकुण ५० लिटरच्या ड्रममध्ये मोहाफुल सडवा प्रत्येकी लिटर ४०/—रू. याप्रमाणे २०००/— रू. चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. आरोपी विरुद्ध पो.स्टे कन्हान येथे कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोस्टे कन्हान अंतर्गत दि. ०४/०३/२०२४ रोजी पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत निलज खंडाळा येथे पेट्रोलींग करीत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून कन्हान हद्दीतील **आरोपी नामे— राजेश रामदास चकोले, वय ४३ वर्ष रा. निलज खंडाळा** हा देशी दारू बाळगताना मिळुन आल्याने त्याचे कडुन १३ निपा देशी दारू ९० एम एल चा किंमती ४५५/—रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोस्टे रामटेक येथे दिनांक ०४/०३/२०२४ रोजी **आरोपी नामे— प्रकाश भद्दु दुधपचारे वय ३६ वर्ष रा. पंचाळा ता. रामटेक** हा अवैधरीत्या मोहाफुल दारू बाळगतांना मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून १) ४ बोरीमध्ये रसायण सडवा प्रत्येकी २० रू. लिटर प्रमाणे २८००/—रू २) ४० लीटर मोहाफुल गावठी दारू प्रत्येकी ५० रू लीटर प्रमाणे २०००/—रू. ३) हातभट्टी दारू काढण्याचे साहीत्य कि. ९९० रू. असा एकुण कि. ५७९०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीविरूद्ध पोस्टे रामटेक येथे कलम ६५ (b)(c)(e)(f) मदाका. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कन्हान येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक उमेश पाटील, पोस्टे भिवापूरचे ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक प्रमोद चौधरी, पोस्टे रामटेकचे ठाणेदार पोलीस निरीक्षक प्रशांत काळे यांनी स्टाफसह पार पाडली.

## अपहार करणाऱ्या मुख्य आरोपीस केले नागपूर ग्रामीण पोलीसांनी अटक

पोलीस स्टेशन काटोल नागपुर (ग्रा.) येथील गुन्हे प्रकटीकरण पथकाने मा. वरिष्ठाच्या मार्गदर्शनाखाली १) अप. क्र. ९५/२०२४ कलम ४०८ भा.द.वि या गुन्हयातील मुख्य आरोपी अज्ञात ट्रक चालक नामे – **१) युगराज सिंग रामअधीन यादव वय २१ वर्ष राहणार पांडेयपुर उप्परवार पोस्ट भवानीपुर तहसील औराई जिल्हा भदोही उत्तरप्रदेश** याचा कसोशीने शोध घेवुन त्यास ग्राम सासाराम जिल्हा रोहतास राज्य बिहार येथुन अटक करून गुन्हयातील अपहार झालेल्या मुद्देमालापैकी नगदी १३,००,००० /– लक्ष रूपये हस्तगत करण्यात गुन्हे प्रकटीकरण पथकास यश आलेले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ मा. श्री. बापु रोहम उपविभागीय पोलीस अधिकारी,काटोल विभाग काटोल यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार श्री. निशांत मेश्राम काटोल गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे , पोलिस उपनिरीक्षक कृष्णा गोंगले, पोलीस हवालदार कैलास उईके, पोलीस नायक भुषन मदनकर, निलेश तायडे पोलीस अंमलदार गौरव बखाल यांनी पार पाडली आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर